# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

शिक्षणाचा अधिकार

सर्व शिक्षा अभियान

सारे शिकूया, पुढे जाऊया

जा.क्र. :– 892/शि.वि./सशिअ दि. 16/12/2015

प्रति,

सर्व मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका
प्राथ/उच्च प्राथ/माध्यमिक शाळा
म.न.पा. नागपूर

विषय :— प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत
संकलित मूल्यमापन— १ चाचणी आयोजनाबाबत

संदर्भ :— १) प्रगत शैक्षणि महाराष्ट्र शासन निर्णय दि. २२ जून २०१५
२) सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापनाचा शासन निर्णय दि. २० ऑगस्ट, २०१५
३) क्र. मराशैसंप्रप/मूल्यमापन/२०१५—१६ दि. १७/१०/२०१५.
४) जा. क्र. मराशैसंप्रप/मूल्यमापन/२०१५—१६ दि. ११/१२/२०१५.

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, शासन निर्णय दिनांक २२ जून २०१५ अन्वये प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत प्रथम भाषा व गणित या विषयांची पायाभूत चाचणी माहे जुलै २०१५ मध्ये घेण्याचे प्रस्तावित करण्यात आले होते. परंतु पायाभूत चाचणीच्या प्रश्नोत्तरपत्रिका राज्यस्तरावरून पुरविण्याच्या धोरणामुळे व त्याअनुषंगाने काढलेल्या निविदाप्रक्रियेमुळे पायाभूत चाचणी माहे जुलै २०१५ ऐवजी सप्टेंबर/ऑक्टोबर २०१५ मध्ये घेण्यात आली.

या कार्यक्रमांतर्गत संकलित मूल्यमापन—१ ही माहे ऑक्टोबर २०१५ मध्ये घेण्याचे उपरोक्त संदर्भिय (१) अन्वये प्रस्तावित होते. तथापि पायाभुत चाचणीस विलंब झाल्यामुळे संकलित मूल्यमापन—१ ही चाचणी माहे ऑक्टोबर २०१५ ऐवजी ती दिवाळीनंतर घेण्यात येईल त्याचे वेळापत्रक आपणास यथावकाश दिले जाईल असे उपरोक्त संदर्भिय ३ अन्वये आपणास कळविण्यात आलेले होते.

तथापि राज्यातील अनेक शाळांनी सातत्यपूर्ण सर्वंकष मुल्यमापनाचा शासन निर्णय दिनांक २० ऑगस्ट, २०१० अन्वये प्रथम भाषा व गणित या विषयांची संकलित मूल्यमापन—१ ही चाचणी माहे ऑक्टोबर/नोव्हेंबर २०१५ मध्ये घेतली असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे आता पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत. **राज्यस्तरावरून घेण्यात यावयाची संकलित मूल्यमापन—१ ही चाचणी आता राज्यस्तरावरून घेण्यात येणार नाही. किंवा या परीक्षेसाठी राज्यस्तरावरून प्रश्नोत्तर पत्रिका किंवा सॉफ्टकॉपी पुरविण्यात येणार नाही.** ज्या शाळांनी विद्या परिषदेच्या

**निर्देशामुळे प्रथम भाषा व गणित या विषयाची संकलित मूल्यमापन—१ ही चाचणी घेतली नसेल त्यांनी त्यांच्या सोईनुसार ही चाचणी शाळास्तरावर तात्काळ घेण्यात यावी. राज्यस्तरावरून यावर्षी तीन ऐवजी दोन चाचण्या घेण्यात येतील.**

संकलित मूल्यमापन—२ ही चाचणी दिनांक २२ जून २०१५ च्या शासन निर्णयानुसार निर्धारित वेळेत घेण्यात येणार आहे. त्याबाबतचे वेळापत्रक शासन स्तरावरून यथावकाश कळविण्यात येईल याची नोंद घ्यावी.

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका, नागपूर

**प्रतिलिपी :—**

१. मा. अपर आयुक्त, म.न.पा. नागपूर

**प्रत : कार्यवाहीस्तव**

१. सहा. शिक्षणाधिकारी, म.न.पा. नागपूर
२. सर्व शाळा निरिक्षक, म.न.पा. नागपूर
३. शहर साधन केंद्र समन्वयक (केंद्र क्र. ३ ते ५), म.न.पा. नागपूर
४. सर्व साधनव्यक्ती, म.न.पा. नागपूर

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका, नागपूर

क्र./जिपना/शि./प्राथ./ 119 /15
कार्यालय शिक्षण विभाग प्राथमिक
जिल्हा परिषद, नागपूर
दिनांक 27-11-15

प्रति,

मुख्याध्यापक,
........सर्व........
नागपूर

विषय :— <u>ज्या ठिकाणी शाळा बाहय विद्यार्थी असू शकतात त्या ठिकाणांचा शोध घेण्याबाबत</u>
संदर्भ :— शिक्षणाधिकारी, मनपा, नागपूर यांचे पत्र क्र. 834 दि. 18.11.2015

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये शिक्षण हक्क कायदा 2009 नुसार 6 ते 14 वयोगटातील सर्व बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क प्राप्त झालेला आहे.

1 ते 5 कि.मी. परिसरातील जी मुले शाळाबाहय आहेत (उपस्थिती कमी असणे बालके अथवा शाळेत सतत गैरहजर असणारी बालके किंवा 6 ते 14 वयोगटातील शाळेत दाखल नसणारी बालके) अशा सर्वांना, कलम चार नुसार नियमित शाळेत आणावयाची जबाबदारी संबंधित शाळेची आहे.

आपण अशा शाळाबाहय बालकांचा शोध घेवून बालकांना शाळेत दाखल करून घेण्याची कार्यवाही त्वरीत करावी.

याकरिता शाळेतील सर्व शिक्षक पालक संघ, शाळा व्यवस्थापन समिती, शैक्षणिक कार्य करणाऱ्या सामाजिक संस्था, मदत गटांचे सहकार्य घ्यावे.

केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयात वेळोवेळी सादर करावा. शाळाबाहय बालकांसाठी ह्या वर्षी सर्वेक्षणासाठी केलेले नियोजन, सर्वेक्षणाचा अहवाल छायाचित्रासहित सादर करावा.

शिक्षणाधिकारी (प्राथ.)
जिल्हा परिषद, नागपूर

प्रतिलिपी :

1. मा. शिक्षणाधिकारी, (माध्य.), जिल्हा परिषद, नागपूर यांना समादराने सादर.
2. शिक्षणाधिकारी, मनपा, नागपूर यांना माहितीस सादर.
3. श्री./ श्रीमती ........................ उपशिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, नागपूर यांना माहितीस सादर.
4. श्री./ श्रीमती ........................ जे.शि.वि.अ. जिल्हा परिषद, नागपूर यांना माहितीस कार्यवाहीस अग्रेषित.

शिक्षणाधिकारी (प्राथ.)
जिल्हा परिषद, नागपूर

उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करून, त्याचा अनुपालन अहवाल सर्वशिक्षा अभियान च्या कार्यालयात पाठवावा

**Education Officer**
**N.M.C. Nagpur**

# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

शिक्षणाचा अधिकार

सर्व शिक्षा अभियान
सारे शिकूया, पुढे जाऊया

जा.क्र. :– 897/शि.वि./सशिअ. दिनांक – 19/09/2015

प्रति,

सर्व मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका
प्राथ/उच्च प्राथ/माध्य. शाळा
म.न.पा. नागपूर

**विषय — सर्व शिक्षा अभियानांतर्गत प्राप्त होणाऱ्या अनुदानाची उपक्रमनिहाय तपशीलवार माहिती शाळेच्या दर्शनी भागावर/फलकावर प्रसिध्द करणेबाबत.**

**संदर्भ — जा.क्र. मप्राशिप/प्रमा/२०१५–१६/३४९१, दि. १२/१२/१५**

बालकाचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकारी अधिनियम, २००९ ची अंमलबजावणी करण्यासाठी सर्व शिक्षा अभियानांतर्गत विविध स्वरूपाची अनुदाने शाळा पातळीवर दरवर्षी उपलब्ध करून दिली जातात. शाळा व्यवस्थापन समिती मार्गदर्शक सूचनेनुसार या अनुदानाचा विनियोग करण्यासाठी सक्षम आहे. या अनुदानाचा विनियोग मार्गदर्शक सूचनेनुसार प्रभावी व परिणामकारक करण्यासाठी शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्यांना वेळोवेळी प्रशिक्षण दिले जात आहे.

सर्व शिक्षा अभियांनातर्गत शाळेस प्राप्त होणाऱ्या उपक्रमनिहाय अनुदानाची माहिती शाळा व्यवस्थापन समिती, पालक, समाज, बालक या सर्वांना होण्याच्या दृष्टीने सदरची माहिती शाळेच्या दर्शनी भागावर प्रसिध्द करण्याबाबत वेळोवेळी सूचना देण्यात आल्या आहेत. भारत सरकारच्या संयुक्त आढावा पथकाने दि. ०४/१२/२०१५ रोजी काही जिल्यांतील शाळांना भेटी दिल्या असता त्या ठिकाणी अशाप्रकारची माहिती प्रसिध्द करण्यात आली नसल्याचे दिसून आले. याबाबत संयुक्त आढावा पथकाने सर्व शाळांमध्ये सर्व शिक्षा अभियानांतर्गत प्राप्त होणाऱ्या उपक्रमनिहाय अनुदानाची माहिती शाळेच्या दर्शनी भागावर प्रसिध्द करण्याबाबत शिफारस केली आहे.

त्या अनुषंगाने आपल्या स्तरावरून त्वरित उचित कार्यवाही करून सर्व शाळांमध्ये याबाबतची अद्ययावत माहिती प्रसिध्द करावी. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल प्रसिध्द केलेल्या माहितीचा फोटोसह अहवाल संबंधीत झोन शाळा निरिक्षक- यांचेकडे दि. २८/१२/२०१५ पर्यंत देण्यात यावा. शाळा निरिक्षकांनी दिनांक २९/१२/२०१५ पर्यंत दुपारी १२.०० वाजेपर्यंत विना विलंब सशिअ. कार्यालयात श्री. राहुल गोंधळेकर डाटा एन्ट्री ऑपरेटर यांचेकडे देण्यात यावा.

शिक्षणाधिकारी,
नागपूर महानगरपालिका नागपूर

**प्रतिलिपी : माहितीस्तव सविनय सादर**

१. मा. अपर आयुक्त, म.न.पा. नागपूर.

**प्रत : उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित**

२. सर्व शाळा निरिक्षक, झोन क्र. १ ते १०, म.न.पा. नागपूर

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका नागपूर

E:\Rahul\2015-16\Account\Letter